# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामिण), नागपूर
# दिनांक २७/०७/२०२३ (गुरूवार)

---

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्रमांक संकीर्ण–२०२३/प्र.क्र.०२/१८(र.व.का.) दिनांक ०२ फेब्रुवारी २०२३ परिपत्रकानुसार राज्य शासनामध्ये शासकीय कामकाजामध्ये गती व्हावी, कामकाजात सुसुत्रता व्हावी, दस्ताऐवज व माहिती सुरक्षित राहावी, कार्यालयात सादर केलेली टपाल ही संबंधीतास त्वरीत व जलद गतीने प्राप्त होवून त्यावर निर्णय प्रक्रिया सुलभ व्हावी याकरीता महाराष्ट्र शासनाने सर्व विभागाकरीता ई–ऑफिस प्रणाली निर्माण केली आली आहे.

सदर ई–ऑफिस प्रणालीमध्ये कार्यालयात येणाऱ्या टपाल ज्यामध्ये कार्यालयात प्रत्यक्ष प्राप्त होणारे टपाल (Physical Dark) व इलेक्ट्रॉनिक माध्यमातुन येणारे टपाल (Electronic Dark) स्विकारण्यात येईल. सदर टपालीमध्ये अर्जदार/तक्रारदार यांनी आपला मोबाईल क्रमांक व ईमेल आयडी देणे आवश्यक आहे. जेणेकरून टपाल सादर केल्यास त्यांना मोबाईलवर किवा ईमेलवर संगणक क्रमांक (पोचपावती क्रमांक) प्राप्त होईल. सदर संगणक क्रमांकाव्दारे सदर अर्जदार/तक्रारदार आपल्या टपालाची शहानिशा करू शकतील.

त्यानुसार पोलीस महासंचालक महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी ई–ऑफिस प्रणाली महाराष्ट्र पोलीस दलाच्या सर्व घटक कार्यालयामध्ये अंमलात आणण्याबाबत निर्देशती करण्यात आले आहे. त्यानुसार पोलीस अधीक्षक, नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर या कार्यालयात दि. २४/०७/२०२३ पासुन ई–ऑफिस प्रणाली सुरू करण्यात आली असुन, यापुढे या कार्यालयात येणारे टपाल केवळ ई–ऑफिस प्रणालीव्दारे स्विकारण्यात येणार आहे.

यामध्ये मा. श्री. विशाल आनंद (भापोसे), पोलीस अधिक्षक नागपूर ग्रामीण, मा. डॉ. संदिप पखाले, अपर पोलीस अधिक्षक, नागपूर ग्रामीण, मा. श्री. विजय माहुलकर, प्रभारी पोलीस उप अधिक्षक (गृह), नागपूर ग्रामीण व श्री उमेश फुंदे, कार्यालय अधिक्षक, नागपूर ग्रामीण यांचे मोलाचे मार्गदर्शन असून त्यांच्या मार्गदर्शनाखाली ई–ऑफिस प्रणाली राबविण्यात येत आहे.

## दरोडा टाकणा—या आरोपीविरूध्द गुन्हा नोंद.

**पोलीस स्टेशन सावनेर** :— अंतर्गत मौजा सावनेर हायवे बायपास रोडवर छिंदवाडा पुल २ किमी उत्तर, येथे दिनांक २६.०७.२३ चे १३.१५ ते १३.३० वा दरम्यान, फिर्यादी हे मध्यप्रदेश उमरानाला येथुन १६ चक्का ट्रक गाडी क्र. एम एच ४० सी डी ५४१० ने आपले सोबत क्लिनर सह केळवद हायवे बायपास छिंदवाडा पुलाचे खालुन हैद्राबाद येथे जात असतांना यातील आरोपीतांनी फिर्यादीचे ट्रकवर दगड फेकुन अडवुन थांबविली व त्यानंतर गाडीचे समोरील कॅबीनचे काच लाठी व काठीने मारून फोडले. गाडीवर फेकलेल्या दगडामुळे गाडीच्या काचा फुटुन फिर्यादी व क्लिनर साईडने, गाडीचे आतमध्ये फिर्यादीचे ताब्यातील रेडमी कंपनीचा जुना वापरता ॲन्ड्राईड मोबाईल किमती ५०००/— रू व पॅन्टचे खिशातील पैशे कि १०५००/— रू असा एकुण १५५००/— रू चा मुद्देमाल घेवुन पळुन गेले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— राजेश सुरेशलाल धुर्वे वय ३१ वर्ष रा उंदरावास कॉलनी गोरेघाट तह मोहखेड जि छिंदवाडा यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपी नामे— रोहीत ग्यार रा सरोरा व ईतर साथीदार यांचे विरूध्द कलम ३४१,३३६,४२७,३९५ भा.द.वि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि नागवे मो क्र ९८२३४०३५६५ हे करीत आहे.